प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

29 सप्टेंबर, 2015

**श्री गणेश सहकारी बँक लि., नाशिक, महाराष्ट्र,**
**ह्यांना आरबीआयने दिलेल्या सूचनांबाबत मुदतवाढ**

भारतीय रिझर्व बँकेने अधिसूचित केले आहे की, श्री गणेश सहकारी बँक लि., नाशिक ह्यांना, बँकिंग विनियम अधिनियम 1949 (एएसीएस) च्या कलम 35 (अ) खाली, निदेश क्र. युबीडी. सीओ.बीएसडी-आय/डी-39/12.22.435/2012-13 एप्रिल 1, 2013 अन्वये, सहा महिन्यांच्या कालावधीसाठी तिच्या सूचनांखाली ठेवलेले होते. ह्या निदेशाची वैधता, आमचे अनुक्रमे निदेश दि. सप्टेंबर 23, 2013; मार्च 27, 2014; सप्टेंबर 17, 2014 आणि मार्च 19, 2015 अन्वये प्रत्येकी सहा महिने वाढविण्यात आली होती. जनतेच्या माहितीसाठी येथे अधिसूचित करण्यात येते की, श्री गणेश सहकारी बँक लि., नाशिक ह्यांना दि.01 एप्रिल, 2013 रोजी दिलेल्या निदेशाचा, (ज्याची वैधता सप्टेंबर 29, 2015 पर्यंत वाढविण्यात आली होती) कार्यकाल, आमच्या सुधारित निदेश क्र. डीसीबीआर.सीओ.एआयडी/डी-17/12.22.435/2015-16 सप्टेंबर 25, 2015 अन्वये, सप्टेंबर 30, 2015 ते मार्च 29, 2016 पर्यंत असा आणखी सहा महिन्यांसाठी, पुनरावलोकन करण्याच्या अटीवर ह्या बँकेवर जारी असणे सुरुच राहील. संदर्भित निदेशाच्या इतर अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल नाही. जनतेच्या माहितीसाठी, सप्टेंबर 15, 2015 च्या निदेशाची एक प्रत वरील बँकेच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात आली आहे.

रिझर्व बँकेने वरील निदेशात केलेल्या बदलाचा अर्थ, त्या बँकेच्या आर्थिक स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली असल्याबाबत रिझर्व बँकेचे समाधान झाले आहे, असा लावण्यात येऊ नये

**अजित प्रसाद**
सहाय्यक महाव्यवस्थापक

**वृत्तपत्र निवेदन: 2015-2016/779**